# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुवाडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0337 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/12/2024 02:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 11/12/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/12/2024
**Time From (वेळेपासून):** 14:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/12/2024 **Time (वेळ):** 17:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/12/2024 01:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय शाहुवाडी,शाहुवाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विजयकुमार मधुकर शिणगारे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | येलुर ता वाळवा, ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | येलुर ता वाळवा, ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7020090016

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन बाळकष्ण मोरे | | | 1. जुने पारगाव,,ता हातकणंगले,, वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रथमेश रविंद्र डंबे | | | 1. नवे पारगाव, , ता हातकणंगले, जिकोल्हापूर,वडगांव ,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000रु त्यामध्ये 500 दराच्या 10 भारतीय चलनी नोंटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 12/12/2024

मी विजयकुमार मधुकर शिणगारे, वय - 46 वर्षे, व्यवसाय - शेती , रा. येलुर ता. वाळवा, जि. सांगली मो.नं. 7020090016 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 11/12/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे येवुन पोलीस उपअधीक्षक श्री.वैष्णवी पाटील यांची भेट घेवुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझी पत्नी सौ विदया विजयकुमार शिणगारे हिचे माहेर बांबवडे, ता.शाहुवाडी हे आहे. माझे सासरे मुरलीधर महादेव तेली, रा. बांबवडे यांचे दिनांक 29/11/2018 रोजी निधन झाले आहे. त्यानंतर सासरे मुरलीधर यांचे प्रॉप्रटीचे वारस म्हणुन माझी पत्नी विदया व तिचे भाऊ,बहिण तसेच सावत्र आई असे वारसदार आहेत. माझी पत्नी सौ विदया यांनी दिनांक 07/11/2024 रोजी ग्रामपंचायत बांबवडे येथे ग्रामविकास अधिकारी यांचे नावे त्यांचे वडील मुरलीधर तेली यांचा मृत्युचा दाखला व घरठाण उतारा मिळावा म्हणुन अर्ज केलेला होता. सदर कामाचा मी पाठपुरावा करीत आहे त्याकरीता मी दिनांक 07/11/2024 रोजी पासुन ग्रामविकास अधिकारी मोरे साहेब यांना वेळोवेळी भेटलो पण त्यांनी दाखला व उतारा देणेसाठी टाळाटाळ करीत आहेत. मी दिनांक 08/12/2024 रोजी ग्रामविकास अधिकारी मोरे यांची भेट घेतली त्यावेळी मी त्यांना माझे पत्नी ने केले अर्जाप्रमाणे तिचे वडीलांचा मृत्युचा दाखला व घरठाण उतारा दया मला त्याची गरज आहे असे सांगितले त्यावेळी त्यांनी मला मृत्युचा दाखला व घरठाण उतारा देतो पण त्यासाठी 20,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना कायतर कमी करा म्हणुन विनंती केली पण त्यानी माझे काही ऐकले नाही. त्यावर मी ठीक आहे पैशाची जुळणी करून भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो होतो. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दि.11/12/2024 रोजी ग्रामसेवक मोरे यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी त्यांचे ऑफिसकडील पोलीस निरीक्षक आसमा मुल्ला मॅडम यांना बोलावुन घेवुन माझे तक्रारीवर कारवाई करणेबाबत सांगितले. त्यानंतर मी आसमा मुल्ला मॅडम यांना माझी तक्रार सांगुन, तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला.

त्यानंतर त्यांनी मला बाबवडे गावचे पाठीमागे खुटाळवाड येथे रोडलगत थांबणेस सांगितले. त्यानंतर काही वेळाने मुल्ला मॅडम व त्यांचा स्टाफ तेथे आले. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून दिल. त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हाला देवुन ग्रामपंचायत बांबवडे येथील ग्रामसेवक सचिन मोरे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 कराळे यांना ग्रामसेवक सचिन मोरे यांना भेटणेकरीता पाठविले. मी ग्रामपंचायम कार्यालय बांबवडे येथे आलो तेथे मोरे साहेब नव्हते म्हणुन मी ग्रामपंचायत मधील क्लार्क पाटील यांना मोरे साहेब यांना फोन करणेस सांगितला त्यावेळी तेथील क्लार्क यांनी मोरे यांना फोन केला त्यानंतर क्लार्क यांनी ते पंचायत समिती शाहुवाडी येथे असल्याचे व माझे कामाचे अनुषंगाने त्यांनी मला शाहुवाडी येथे बोलविल्याचे सांगितले. त्यानंतर मी मोरे साहेब यांना त्यांचा मोबाईल नंबर 9975401555 वरती दोन वेळा फोन केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर मी पुन्हा मोरे यांना फोन करून शाहुवाडीला येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी मुल्ला मॅडम यांना मेसेज करून मोरे यांनी शाहुवाडी

पंचायत समिती येथे बोलाविले असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला तरोच पुढे शाहुवाडी पंचायत समितीमध्ये जाणेरा सांगितले. त्यानंतर मी व पंच शाहुवाडी पंचायत समिती येथे आलो. त्यावेळी मी मोरे यांना फोन करून पंचायत समिती जवळ आल्याचे सांगितले. त्यानंतर काहीवेळाने मोरे साहेब तेथे आले त्यावेळी माझेत व त्यांचेत माझे पत्नीने केलेल्या अर्जाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी त्यांनी मला पत्नीला सहीला का आणले नाही असे विचारून अर्जावर पत्नीची सही लागेल असे म्हणाले. त्यावेळी मी पत्नीची तब्येत बिघडलेबाबत सांगितले. त्यानंतर मी मोरे यांना आपल परवा ठरल्याल नक्की किती दयायच आकडा सांगा मला असे म्हणालो. त्यावेळी मोरे वीस हजार ... असे म्हणाले. त्यावेळी मी वीस..हं..हाय का असे म्हणालो. त्यावेळी मोरे अहो हे असस नाही हो असे म्हणाले त्यानंतर आमचेत माझे पत्नीचे सही वरून बोलने झाले. त्यावेळी मी मोरे यांना बर त्या दोस्ताला घेवुन आलोय, त्याज्याकडन पैसे काढुन आणतो , ए टी एम मधन पैसे काढुन आणतो असे म्हणालो. त्यावेळी मोरे या जावा या जावा असे म्हणाले त्यावेळी मी किती असे विचारले त्यावेळी मोरे काय आसल ते आणा जावा, जावा मी काय सांगणार नाही असे म्हणाले त्यानंतर आमचेत पुन्हा कामाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी मी बर किती आणु दे, पाच ...असे म्हणालो. त्यावेळी मोरे बर बर आणा..असे म्हणाले. त्यावेळी मी हां..पाचात हे करूया...असे म्हणालो त्यावेळी मोरे हं.. असे म्हणाले त्यानंतर तेथुन मी व पंच परत निघुन येत असताना मला मोरे यांचा फोन आला त्यावेळी त्यांनी मला ऑनलाईन पैसे पाठवा असे म्हणाले त्यावेळी मी नाही ऑनलाईन नाहीत, तेचा ऑनलाईन नाही , आलोकी लगेच आलो की... असे म्हणुन फोन बंद केला त्यानंतर मी व पंच असे निघुन रोडने बांबवडे येत असताना शाहुवाडी येथे रोडवर मला मुल्ला मॅडम व त्यांचा स्टाफ व गाडी असे दिसले त्यांना पाहुन त्यांचेजवळ थांबलो. त्यावेळी मी मुल्ला मॅडम यांना घडलेली सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर लागलीच मुल्ला मॅडम यांनी सापळा कारवाई सुरू केली सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 5,000/- रूपये माझे पन्टचे पाठीमागिल उजवे खिशात ठेवुन मला योग्य त्या सुचना देवून ग्रामविकास अधिकारीर सचिन मोरे यांना भेटण्याकरीता जाण्याचे सांगितले. त्यानंतर रेकॉर्डर सुरु करून ते माझेकडे दिला. त्यानंतर मी व पंच कराळे असे माझे मोटार सायकलवरून निघालो त्यावेळी माझे पाठोपाठ सापळा पथक आले. मी शाहुवाडी पंचायत समिती येथे आलो. त्यावेळी माझे पाठापोठ सापळा पथकातील सर्वजण आजुबाजुला थांबले. मी मोरे साहेबांना फोन करून आल्याचे सांगितले त्यावेळी मोरे साहेबांनी ते गावाकडे गेल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना आत गेलेले पाहीले आहे असे म्हणालो त्यावेळी मोरे यांनी ते मिटींग मध्ये असलेचे सांगितले. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मोरे यांना मी बाहेर बोलविले त्यावेळी त्यांनी आलो आलो असे म्हणाले त्यानंतर काहीवेळाने मोरे साहेब तेथे आले त्यावेळी मोरे बोला असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना या असे म्हणालो त्यावेळी मोरे या इकड या इकड या, पैसे मला काय आत्ता देवु नका ऐका सांगतो असे म्हणाले त्यावेळी मी कस तरी मी जुळणी केली आहे असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी येतो मी तुम्ही सांगितल्या प्रमाण पाच हजार आणल्यात असे म्हणालो. त्यावेळी मोरे मला हित काय देवु नका मला, नगो नगो काय देवु नका मला, संध्याकाळन मिसेस ला आल्यावर घेवुन या असे म्हणाले. त्यावेळी मी हित कोण नाहीत तवर घ्या असे म्हणालो. त्यावेळी मोरे घेवुन या ना असे म्हणाले. त्यावेळी मी पैसे खर्च होत्यात असे म्हणालो. त्यावेळी मोरे थांबा ऐका हया मानसाला एका दया तेज्याकड दयायला लावा पैसे सांगतो असे म्हणाले. त्यावेळी मी कुठल्या मानसाकड देताय असे म्हणालो. त्यावेळी मोरे यांनी कोणाला तर फोन केला व फोन उचल की, उचल की, फोन चालु हाय व्हय, फोन झाला का, बंद झाला असे म्हणाले. त्यावेळी मोरे यांचेजवळ एक इसम फोनवर बोलत बोलत आला त्यावेळी मोरे यांनी मला हेच्याकड दया, असे म्हणुन त्या इसमाला हे घ्या तेवढ तुमच्याकड असे म्हणाले त्यावेळी मी मोरे यांना साहेब पाच हजार रूपये आणल्यात मोजुन घ्या असे म्हणुन मी मोरे साहेबांचे सांगणेवरून त्यांनी सांगितलेल्या इसमाकडे 5000/- रूपये दिले. त्यावेळी त्या इसमाने सदरचे पैसे मोरे साहेबांचे सांगणेप्रमाणे माझेकडुन घेवुन त्यांचे पॅन्टचे खिशात ठेवले. त्यावेळी मोरे साहेब आसुदे असे म्हणाले. त्यानंतर त्यांना मी माझे काम करणेबाबत सांगितले. त्यानंतर मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मुल्ला मॅडम आणि त्यांचा स्टाफ तेथे आला त्यावेळी सापळा पथकाने लाच स्विकारलेल्या रक्कमेसह त्या इसमास व ग्रामविकास अधिकारी सचिन मोरे यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही शाहुवाडी पोलीस ठाणे येथे येवुन पुर्ण करण्यात आली. त्यावेळी मला त्यांची नावे 1) सचिन बाळकृष्ण मोरे, वय - 44 वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी, वर्ग - 3 (ग्रामविकास अधिकारी), परखंदळे व बांबवडे, ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर रा. जुने पारगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर 2) प्रथमेश रविंद्र डंबे, वय -22 वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी, वर्ग - 3 (ग्रामविकास अधिकारी), साळशी - पिशवी, ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर रा. जुने पारगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर अशी असल्याचे मुल्ला मॅडम यांचेकडुन समजले.

तरी माझे पत्नी ने ग्रामपंचायत बांबवडे येथे तिचे वडील मयत झालेने त्यांचे मृत्युचा दाखला व वडील राहत असलेल्या घराचा घरठाण उतारा मिळावा म्हणुन अर्ज केलेला होता. त्याकरीता मी ग्रामपंचायत अधिकारी सचिन मोरे यांची भेट घेतली त्यावेळी मोरे यांनी माझे सासु-यांचा मृत्युचा दाखला व घरठाण उतारा देणेसाठी माझेकडे प्रथम 20,000/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती 5,000/-रूपयांची अप्रामाणिकपणे मागणी केली त्यानंतर ग्रामविकास अधिकारी मोरे यांचे सांगणेवरून प्रथमेश डंबे, ग्रामविकास अधिकारी, साळशी पिशवी यांनी मोरे यांच्या सांगणेवरून त्यांचे समक्षच माझेकडुन बेकायदेशिरपणे 5,000/- रूपये लाच रक्कम स्विकारले नंतर त्या दोघांना अँन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी ग्रामपंचायत अधिकारी सचिन मोरे व प्रथमेश डंबे यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

amit arun patil

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)